१०७५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ५७८

# काव्यानंदमंजूषा.

## भाग ३

लेखक व प्रकाशक

एकनाथ यादव निफाडकर

REFBK-0001570
REFBK-0001570

१९१८

# काव्यानंदमंजूषा

( मधुमालती, तारागड, सोक्षमोक्ष,
शिवसाम्राज्य, आर्यतेज इत्यादि
ग्रंथांचा कर्ता. )

एकनाथ यादव निफाडकर

यस्मिञ्शौर्यं च वीर्यं च तेजो धैर्यं पराक्रमः
औदार्यं चैव गाम्भीर्यं श्रीर्ह्रीर्धर्मो दयाऽऽर्जवम्
एवमादिगुणोपेतो महाराष्ट्रो न संशयः ॥

महाभारते

REFBK-0001570
REFBK-0001570

१९१८

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ प्रेम | १ |
| २ माझें लग्न | १ |
| ३ ——ला | ५ |
| ४ सिंधू व मधू | ८ |
| ५ कवि आणि गुलाबकळी | १२ |
| ६ निराशिताची सरस्वतीस विनंति | १४ |
| ७ महाराष्ट्रप्रीति | १५ |
| ८ अविचारी पतंगा ! | १८ |
| ९ हे दिन ! | २० |
| १० नीचा सागरा ! | २१ |
| ११ शिवाजीच्या छायेचे उद्गार | २३ |
| १२ शिवबा येइल भूवरती | २५ |
| १३ प्रिय चंडोला ! | ३२ |
| १४ इंदूचें फूल | ३७ |
| १५ ती हीच भागीरथी | ३८ |
| १६ मी कवयित्री कशी झाल्यें | ३९ |
| १७ गीतारहस्यानंद | ३९ |
| १८ जाग्रत ! | ४२ |
| १९ मी सांगू तरी काय ? | ४४ |
| २० वर मागितलाच पाहिजे | ४६ |
| २१ तर मग हें दें ! | ४७ |

आ. क्र. १५७०

# आजची प्रस्तावना

आणि

## अर्पण-पत्रिका

म्हणजे

फक्त पुढील प्रार्थना

होय.

" देवा, अशा दिव्य राष्ट्रार्थ माझी
घडो नित्य सेवा असें मागणें;
छे, मी करीं याचना याच देशीं
घडो जन्म सारे, न हें सांगणें.
येवो कसेही मला जन्म येथें
अहो लोचनांनो, सहा ते सहा !
राष्ट्री महाराष्ट्र देशास वाहा
पुन्हां काव्यपुष्पें मना रे वहा ! "

# काव्यानंदमंजूषा.

ग्रंथालय
दा. क्र. १५६०
शाखा

## प्रेम.

चाल—नंदनवनदेवीनें माझा—

सृष्टि प्रेमाची मूर्तिच ही, प्रेमीही प्रेम;
जगतिं न कांहीं प्रेमाविण या, प्रेमहि तें प्रेम ॥ ध्रु ॥
लतिकाकलिकाविकसन सोडी गंधमिषें प्रेम;
तत्सौगंधें दंतिहि दावी डोलुनिया प्रेम.
करतलिं घेउनी शीर करी तो योद्धा संग्राम;
स्वदेशार्थ तो स्वार्थहि नेणें कधिं जनता-राम.
चंदनसम तनु भक्तासाठीं झिजवीही राम;
निज कवनीं चिर गुंगित कविही; हें सारें प्रेम.

जळगांव—ग्रीन बॉवर. आर्यवैभव.
१९१५

## माझें लग्न.

माझी वधू काव्यकामिनी आहे हें रसिकांस सांगितलेंच पाहिजे का?

पादाकुलक वृत्त.

प्रभातकाळीं सागरतीरीं
खेळत होतों मी पुळिनावरि;

निशा निमाली, उषा उदेली
तारकतति आकाशीं थिजली;
शुक्रचांदणीसह इंदूनें
धरिला हट्ट जरी द्वेषानें
उषासतीनें खुदकन हसुनी
लाजविलें त्यांनांही स्वमनीं;
द्वेष निमाला विधु थबथबला
सागरजलिं त्याचा रस गळला;
तोंच निघाली सुगंधलहरी
पातालांतुनि आली मंजवारि;
थरथरलें मम अंग, भारिलें
तत्संगेंधें मन्मन हरिलें;
चटकचांदणी कुठें निमाली ?
कशी पळाली ? कुणी हारिली ?
वा जलधींतच गळुनी पडली ;
जाणाया मन्मति नच झाली.
जिकडेतिकडे त्याच सुगंधें
दरवळलें जग दिव्यानंदें;
पर्वततुंगें दऱ्याहि झाल्या—
गंधित, तरुवरलतिका भरल्या-
त्या सौगंधें, भ्रमरहि रमले
कृष्ण पीत नागही डोलले.
अशी जाहली प्रमुदित सृष्टी
शांत जहाली मातिसम दृष्टी.

तधीं भासलें कुणी लाविला
हात कोंवळा गोंडस मजला.
हळूंच माझे नयन उघडिलें,
तोंच—अहाहा!— भानच गेलें!
स्वरूप सुंदर दिव्य अहाहा!
बघुनी झाला भ्रमित कवी हा!
ही सुरकन्या कीं अहिकन्या?
अथवा जलनिधिदुहिता धन्या?
किंवा गगनश्री अवनीवरि
आली खेळाया लहरींवरि?
किंवा आली उषाच येथें
सोडुनि मजकरितां गगनातें?
किंवा सुमरेणूंचा प्राण
मूर्त जाहला एकवटून;
किंवा लतिकाकोमलता ही
बालारूपें हें जग पाहीं?
किंवा—सरली बाला जवळीं
गात्रें मम रोमांचित झालीं;
अगदीं जवळीं आली बाला
प्रेमावेगें धीर गळाला!
नाजुक गोंडस ओष्ठद्वय तें
एकवटूनी बाला धरिते;
मम दृष्टीशीं दृष्टि भिडूनी
टाकी तरुणी मज मोहूनी.

स्फुरण पावले हस्त तियेचे
कम्प पावले कुच तरुणीचे;
गुलाब गालीं स्पष्ट उदेले
नेत्र मला बोलावू सजले;
अपुल्या दिव्य सुगंधें भ्रमला
कवि हा; ह्मणुनी उशीर झाला;
असें प्रियेतें खचित वाटलें
ओष्ठांजवळीं ओष्ठ आणिले;
हस्तद्वयही निज पसरीलें;
ऊर आपुलें पुढतीं केलें.
अशी कामिनी कामवशा ती
भरली माझ्या अखंड चित्तीं.
ओष्ठाला मी ओष्ठ लाविला
कुचभारहि मग हलका केला;
जरी दाबिलें पुन्हपुन्हां मी
स्फुरण पावले कुच ते नामी;
ओष्ठाचा जरि ओष्ठ न त्यजिला
तरि त्यांतील रस मुळिं नच सरला.
उलट प्रेमावेगें फुटले
मधुप्रवाह त्यामधले सगळे.
रसमधु पीतां अखंड चित्ता
आली तद्हृदयांतिल ममता.
कटिप्रदेशा जवळीं करुनी
हस्त तिच्या केशांत फिरवुनी,

डुंगडुंगिलें शीर तियेचें
घर्मबिंदुही पुसले साचे;
गुलाब गालींचेही धरिले
ओष्ठीं, तरि ते लाल राहिले;
केलें वरती वदन तियेचें
तोंच उडाले गुलाब साचे!
पारि दिसलीं वदनांतिल मोत्यीं
गुलाब पुनरपि गालांवरती!
आली जडता नेत्रांवरती
ओळखिली वदनांतिल कांति;
नंतर सागरजलांत नेलें—
प्रियेस दिव्यानंदा दिधलें;
हृदयाशीं हृदयेंच बांधिली
हृदयाची हृदयांत निमाली!
देतो क्रीडासंगम आमुचा
कविताकन्या लाभसुखाचा.

मुंबई—बॅकबे. १९१५

## ----ला

(मद्रास इलाख्यांत कावेरीच्या तीरावर श्रीरंगम् नांवाचें एक सुंदर गांव आहे. पलीकडल्या तीरावर प्रसिद्ध त्रिचनापल्ली शहरांतील किल्ला आहे. एके दिवशीं मी श्रीरंगम् येथील एका बागेंतल्या पुष्पवाटिकेंत शांतपणें विचार करीत बसलों होतों. तेव्हां एक तद्देशीय ब्राह्मणबाला तेथें आली. तिच्या हातांत फुलांनीं भरलेली एक परडी होती. फुलें

वेचतां वेचतां तीं मजजवळ आली. तोंच ती व मी असे दोघेहि दचकलों व स्तब्ध एकमेकांकडे पहात बसलों. कांहीं वेळानें मी तिला ह्मटलें:— )

## दिंडी.

" तुजसि बघतां स्मृति पूर्वींची जहाली;
स्वसा वाटे मृत आज पुन्हां आली!
याच भृकुटी, ही नासिका तियेची;
हींच नयनें तीचींच गमति साचीं.
" लकब तीची ही केशकलापांची;
भाल दावी भा तिच्या ललाटींची.
स्कंध जैसे तव गोल वाढतात
तसे तीचेही आज अठवतात.
' तिच्या हस्तांचे स्पर्श सुखद होते;
—कुणा वृक्षाचें भाग्य उदय घेतें!—
ीहि हसवीती पुष्पगुच्छ खास
ाज असतें मन्मनहि उल्हसीत.
' हसत गळतीं परडींत सुमें ताजीं;
दें हसती परडीहि खचित आजीं ;
ाशिच तुजसम मजकडे पाहती ती;
धुनि मधुनी ऐशीच धावती ती.
मधुनि जेव्हां गे, मजकडे पहासी
म भावाचें आंत घे शिगेसी !
ठा वाटे पुनरपी बाल व्हावें;

खूप भृंगांसम तुजसवें हसावें;
" पुन्हां तुजसम ऐसेंच बागडावें;
खूप धावावें, स्तब्ध पुन्हां व्हावें;
व्यर्थ गावें, बंधूहि चीडवावा;
सान भाऊ चुंबून हासवावा.
" हाय! गेले ते दिवस शांततेचे!
सदानंदाचे, सुखद विस्मृतीचे!
हाय! खाते मज राक्षसी स्मृती गे!
मनस्सदनासी आज आग लागे!!
" कुठें ममता? ती सरलताहि कोठें?
कुठें शांती ती? कांति दिव्य कोठें?
कुठें स्थिरता? निष्कपट धैर्य कोठें?
हाय! लज्जाबल आज असे मोठें!
" हाय! लज्जा प्रेमास दाबि आंत!
प्रेम उमटो दे वच न अतिशयांत.
जरी होउनि निर्लज्ज, मुखें बोलें,
कसें समजावें प्रेम तुला बाले?
" भिन्नदेशा तूं, वेश तुझा भिन्न;
भिन्न भाषा, स्थिति भिन्न, सर्व भिन्न;
भिन्न काया, परि मन न खास भिन्न;
भगिनि, नच कां गे, प्रेमही अभिन्न?
" मुखें, कोमल बाले, न वदें प्रेम;
अश्रु नयनांतुन एक करिल काम.

अश्रुमोत्यें हृदयांत सांठवीन;
प्रेमभाषा पुनरपी आंठवीन. ”

× × × ×

धन्य ! सुदती मजसवें बोलली हो !
धन्य ! अश्रूतति गालिं गळाली हो !
अश्रुअश्रूंतुनि भाव दावियेला,
तोच करि या मम सह्य जीविताला !

श्रीरंगम्--कावेरीतीर. उषा
१९१४

## सिंधू व मधू

चाल--अजि म्या ब्रह्म--

मौज कशी जगतीं ॥ पहा हो ॥ दावा धरितीं
पुन्हा खेळतीं मुलें, पितर परि सतत भांडतीं ॥ धृ० ॥
एके दिनिं कवि सायंकाळीं
होता एका ओढ्याजवळीं;
झुळझुळ जलनादांत निमाली
वृत्ति तयाची तदात्म झाली;
फिरली आंतच ती ॥ पहा ॥
फिरतां फिरतां तियेस गमलें
जलांतुनी दो बालक आले;
त्यांतुनि बालक वदला “ बाले,
मन माझें या पुलिनीं रमलें;

ये बांधूं घरटीं" ॥ पहागे ॥
कितीं तयांनीं घरें बांधिलीं,
कितीं स्वहस्तें उधळुनि दिधलीं
मोजाया नच कविमति झाली,
तद्दृष्टी बालांवर खिळली;
बाळेही नेतीं ॥ कविमन ॥
कवि भुलला; बाळेंहि खेळलीं;
जलें स्वनादें स्थलें वदविलीं;
मेघपंक्ति तों त्रिवाजवळीं
क्षितिजीं एकाएकीं आलीं;
मुलें रोष भरितीं ॥ इकडे ॥
एकच घरटें मुदें तयांनीं
आरम्भुनि बांधिलें श्रमांनीं.
'सुंदर!' 'चिमणीसीं राहाया
योग्य!' 'लक्ष रुपयेच पहाया!'
मुलें स्तुती करितीं ॥ अपुली ॥
बालक वदला "सारे घेइन
रुपये, घरटें तरीच देइन;
घर माझें, मी मालक त्याचा;
हक्क न त्याच्यावरी कुणाचा."
डबडबली नेत्रीं ॥ बाला ॥
शब्द न एकहि मुखें वदूनी
बाला गेली पुलिना त्यजुनी;
रडवें अपुलें वदन करूनी

दिधलें जननीतें सांगूनी,
जें झालें पुलिनीं ॥ तदा हो ॥
बालकमाता तिथेंच होती;
पुत्रविक्रमें घाली चित्तीं;
मग वदली " गे सिंधू, सत्ता
पुरुषांची ही सगळी मत्ता;
उद्या तुला तो देइल लत्ता
होतां तूं गे, कन्या दत्ता;
त्याचीं गे, घरटीं ॥ सगळीं " ॥
" उद्यां उद्याचा विचार, आतां
कशास करितां त्याच्या वाता ? "
सिंधूजननी वदली ' सिंधू,
मधूस आणीं, तयास बोधूं;
नको धरूं चित्तीं ॥ रोषा " ॥
परि माता गर्विष्ठ मधूची
तयांस बोले टाकुनि साची,
जेविं नाद नादेंच वाढतो
तेविं तयांतें क्रोध धरी तो.
पळुनि पुलिनीं गेली ॥ सिंधू ॥
इकडे मधु सिंधूस्तव होता
देत दोष अपुल्यासच आतां;
तया न करमे सिंधूवीना
करी वाळुवंटांत रोदना;
ये बाला तों ती ॥ पुलिनीं ॥

येतां तिज मधुनेंही धरिलें
हृदयाशीं मग चुंबचुंबिलें !
अपराधहि मग कबूल केला.
बघुनां ही बालांची लीला
कवि डोले चित्तीं ॥ पुन्हां हो ॥
दोघांचें घर विचार ठरवुनि
मुलें खेळलीं पुन्हा जमूनी
परि गेला कवि तयां टाकुनी
सिंधुगृहीं हलकेंच लपूनी.
विचित्र कविवृत्ति ॥ अशी ही ॥
जणुं स्मरूनी पूर्वजन्मिच्या
वैरा, दंशा विषारि साच्या
करि नागा, कृति या जननींच्या
तशाच कलहीं विषमय दिसल्या—
कविहृदयावरती ॥ उदेल्या ॥
व्यवहाराची सत्त्वशीलता
जगीं दिसे, वद कोण पाळता ?
अजाण अर्भक ? किंवा माता
सुजाण ? कवि ही करी कवीता—
धरुनि मुलां हृदयीं ॥ प्रेमें ॥
दावा धरितीं पुन्हा खेळतीं मुलें,
पितर परि सतत भांडती ॥ मौज ॥

# कवि आणि गुलाबकळी. +

चाल—हे प्रभो विभो, अगाध—

मज दशा तुझी गुलाबकलिके ! कळली ॥
स्थिति दीना तव नच झाली ॥ धृ० ॥
जरि गेला तव भर निघुनी
जरि गेला तव रस गळुनी
जरि गेला तव मद थिजुनी
तव मोहकता नच गेली ॥ मज दशा ॥
जरि नेला तव मध लुटुनी
जरि नेला रतिचरु हरुनी
जरि नेला स्मर—तरु खुडुनी
तव मोहकता नच लुटली ॥ मज दशा ॥
जरि उद्याना त्यजियेलें
जरि सदनातें वरियेलें
जरि तुजसि नरें फसवीलें
तव मोहकता नच गळली ॥ मज दशा ॥
परिमलादि गुण सेवोनी
निज हौस नरें पुरवोनी

---

+ ही कविता ह्मणजे, अभिनवकाव्यमाला भाग १ यांतील श्रीमती हिराबाई पेडणेकर यांच्या ‘ कवि आणि गुलाबकळी ’ या कवितेची पुरवणी आहे असें समजावयास हरकत नाहीं.

नाथ.

मग दिधलें तुज फेकोनी
तव मोहकता नच सरली ॥ मज दशा ॥
तव लाभ कठिण जयिं होता
तयिं मोहकताभर होता;
परि आतां सुलभहि असतां
तव मोहकता नच हरली ॥ मज दशा ॥
तुज तयें नरें झिटकीलें
तुजविशीं मनहि विटवीलें
तरि कवीस बघ हें दिसलें—
तव मोहकता नच मळली ॥ मज दशा ॥
तव गंध, रूप, मृदुताही
लोपुनी जरी बघ जाई
प्रिय, जनां न आतां होई
तव मोहकता नच विटली ॥ मज दशा ॥
स्पर्शनें दुःख जरि त्यासी
तव कंटक रुतति करांसीं
जरि नकोनकोशि ग होसी
तव मोहकता गे, अगळी ॥ मज दशा ॥
उपवनांत जरि नच फुलली
चिरडुनी सदनिं जरि गेली
जनपदां ताडना झाली
खरि आजच मृदुता स्फुरली ॥ मज दशा ॥
तव रूपा ऐसा झाला

कवि मोहित काव्यरसाला
वाटतें खरोखर त्याला
तव मृदुता आज उदेली ॥ मज दशा ॥
तव पतित कलेवर झालें
परि हृदयकुसुम मृदु फुललें
मज मोही समवय बाले,
स्थिति दीना कां हि ग असली ? ॥ मज ॥
दुष्प्राप्य वस्तु जी वाटे
तिजविषयीं लोभ मनिं दाटे
ती प्राप्त होय तरि नाटे
उत्कंठा कविची अगळी ॥ मज दशा ॥

पुणें, पर्वती. १९१५

## निराशिताची सरस्वतीस विनंति.

But bid the strain be wild and deep
Nor let thy notes of joy be first.

*Byron.*

चाल—मज मदनें फसविलें—

हृदय गडे, व्यापिलें । नैराश्यीं दाटलें ॥ धृ० ॥
परि अजुनी क्षम गीतश्रवणा
मनोहारिणी, घेइं ग विणा
कोमलहस्तें छेडी मग तिज !

पडतिल रव या कर्णीं सहज.
आशेचें घरटुलें । समज तियें बांधिलें ॥
संतापें जरि हृदय फाटलें
कीं, नैराश्यें उलुनी गेलें,
एकांतांतिल तव सहज ध्वनि
परिसुनि येइल जल गे, नयनीं.
आशेचें सोनुलें । समज तिथें उपजलें ॥
तार नको! परि कोमलतेची
छेडूं आधीं आनंदाची;
कथितों मोद न गे, या देशीं
गातां होइल उपहासासी;
पाहीजे रव भले । भीषण ते काढिले ॥
भयाण तैसें भेसुर नादें
भेदीं नैराश्यातें प्रमदे,
तान तयाला आनंदाची
अंतीं होते पोषक साची;
ह्मणुनी हें मन कले, तव नादीं लागलें ॥

धुळें. पोएट्स् कॉर्नर मधुमालती १९१३

## महाराष्ट्रप्रीति.

वृत्त—मंदारमाला

राष्ट्रीं महाराष्ट्र देशास पाहा
पुन्हा लोचनांनो, पहा हो पहा !

हा वीर्यदाता तसा दुःखहर्ता
अशा कार्यकर्त्यांस आत्मा वहा !
ही कामधेनू, सुरांचीहि वेणू,
किती यास वानूं असें होतसे;
यातें जरी या शिरीं मी धरीतों
तरी सौख्य सीमेस ना घेतसे.
नाहीं अशीं सौख्यसीमा कुठेंही,
जरी पाहिजे मोद तुम्हां महा
राष्ट्रीं महाराष्ट्र देशास पाहा
पुन्हा लोचनांनो, पहा हो पहा !
ही आत्मवल्ली जवीं सेविली मी
तदा पावली स्फूर्ति या अंतरीं;
त्या स्फूर्तिनें, या मनें चिंतियेलीं—
तशीं गायनें मी करीं सत्वरीं.
देवा, अशा दिव्य राष्ट्रार्थ माझी
घडो नित्य सेवा असें मागणें
छे, मी करीं याचना याच देशीं
घडो जन्म सारे, न हें सांगणें.
येवो कसेही मला जन्म येथें,
अहो लोचनांनो सहा ते सहा !
राष्ट्रीं महाराष्ट्रदेशास पाहा,
पुन्हा लोचनांनो, पहा हो पहा !
हा देश माझा, स्वदेशार्थ मी, हें
असें नित्य नातें पुरा जोडिलें;

आतां न तोडीं सुमैत्रीस तीचें
  पहा वेड माझ्या मना लागलें !
प्राणाहुनी प्यार आहे मला फार;
  याचाच आधार जीवा असे.
हा संकटीं बंधु आनंदिं बंधू
  सदा बंधु बंधुत्व दावीतसे.
याचें कसें श्रेष्ठ तें बंधुनातें
  पहा भारितें या दिशाही दहा !
राष्ट्रीं महाराष्ट्रदेशास पाहा,
  पुन्हां लोचनांनो, पहा हो पहा !
अंधास काठी, तशी गोमटी स्त्री
  जशी कामलुब्धा जगीं होतसे,
नेत्रां तसा देश हा सौख्यसृष्टी
  न दृष्टी कदां न्यून शोधीतसे.
होओ किती हीन होओ किती दीन
  होओ किती म्लान हा अंतरीं,
यातें न सोडीन, जोडीन, ठेवीन,
  पाहीन या अंतरीं मी तरी.
यातें सदा अंतरीं सांठवीन
  जरी जाहला देहही भग्न हा;
राष्ट्रीं महाराष्ट्रदेशास पाहा,
  पुन्हां लोचनांनो, पाहा हो पहा !

जळगांव. म्यु. गार्डन

प्रभात.

## अविचारी पतंगा !

चाल—आनंदी आनंद गडे

कशास करिसी धडपड ही
दीप असे हा; ही न मही.
येथें अग्नीचा लोळ
तेजाचे हे कल्लोळ
नसें फूल, ही दीपशिखा
होसी तिजवरि फिदा फुका.
अरे पतंगा,
कधीं न गंधा
ही वारि अंधा,
कोमलतेतें ही परकी,
घाल उडी, पर मरशिल कीं.
निश्चित जेथें मरण असे
तेथें जावें तुवां कसें ?
तुझे नको कां प्राण तुला ?
दे तर सत्वर गड्या, मला !
कार्य बहुत मम तयांसवें
असले लाखों प्राण हवे.
घेउनि रंगा
तुझ्या पतंगा,
क्षणभर दंगा

करीन बाळ्या फुलांसवें,
दे तर प्राणां सया, जवें.
गड्या, मूढ तूं; परी मुला,
स्वतंत्रतेचा लाभ तुला.
इकडुन तिकडे बागडसी
कोणातेंही नच भीसी.
नव्या दमाचा सोजीर
असतो कोठेंही हजर.
रिपु जरि तव हा दीप तरी
झडप घालिसी त्याजवरी.
अह्मांस ठावे,
शत्रु करावे—
दूर धरावे;
परी न आह्मां आनंद;
नैराश्यीं आह्मी धुंद.
तुवां पांखरा, शिकवावें
गाणें प्रीतीचें गावें
प्रीति तुझी रे, भक्ताची,
अमुची विमूढ दासांची.
उद्यां आजचा धनी नसे,
पर्वा त्याची कुणा असे?
कुणीहि यावें
अमुचें घ्यावें—

धन पळवावें.

मुला, फुलांचें धन हरिसी
स्थिति अमुची नच अनुभवसी.
ह्मणुनि गड्या, दें प्राण मला
अथवा दें स्वातंत्र्याला;
किंवा दें मज रंग तरी
होइन तुजसम मी लहरी.
अथवा कथितों कानांत
कळीव रे, तें देवांत,
लताफुलांसीं
मुला, त्यजीसी
दीपा वरिसी,
तसेंच नाथाचें भाग्य
देशहितार्थातें योग्य.

जळगांव. दिल्ली एक्स्प्रेस्. १९१६.

## हे दिन !

हे दिन—हा ! कसे पहा आलेत अह्मां !
येतात तरंग नाना चित्तांत;
खळबळतें हृदय आमुचें रसरसतें;
पारे नाहीं बोलाया सत्ता कांहीं !
रानांत उगवुनि कलिका मरतात;
गगनांत अनंत उडुगण दडतात;

राष्ट्रांत प्राणी असंख्य मरतात;
चित्तांत उठुनी विचार फुटतात;
हृदयांत थबथबले रस सुकतात;
देहाला वाव मिळे नच फिरण्याला;
मग सृष्टी दृष्टीसम फिरते उलटी;
हे दिन--हा !
असे पहा आलेत अम्हां !

मुंबई सोनापूर. १९१५ उद्यान.

ग्रंथ संग्रहालय रा. क्र. 9560

## नीचा सागरा !

चाल—लक्ष्मीसम चंचल या—

हससि कसा उगिच असा नीच सागरा ?
हास्य तुझें हें माझ्या कांपि अंतरा ! ॥ धृ० ॥
आजवरीं तुज रे, मी
दिधला बहु मान जनीं;
कधिं न लेखिलें कमी;
पूजियलें नित्य मनीं;
ह्मणुनि भ्याड समजुनि मज हससि पामरा ?
सीमा तव उल्लंघुनि
पदतलिं रे, तुज चिरडुनि
होण्या तव जगतिं धनी
धरियलें न पाप मनीं;
ह्मणुनि षंढ गणुनि मला हससि अहिधरा ?

कीं मी कर्तव्यहीन ?
अथवा स्वाधीन सुखां ?
वा मम कीर्तीहि मलिन ?
कीं, बनलों मूर्ख फुका ?
वद तुज रे, कोण व्यंग करित हासरा ?
कीं, तुज पाहोनि मनीं
उठले सात्वीक भाव,
तेच गायिले कवनीं
ह्मणुनी हा विषमभाव ?
गमली वा सात्विकता हीन विषधरा ?
वा रूपें भिन्न तुझीं
सौम्य भयद भीषण तीं
रौद्र शांत समरस जीं
नच ठसलीं हृदयीं तीं,
ह्मणुनि चिडुनि धरिसी कां हास्य-आसरा ?
वद वद रे, कांहिं तरी,
उगिच असा कां छळिसी ?
हास्यासम मौनसुरी
हृदयावरि कां धरिसी ?
बोल बोल कांहिं तरी आज कविवरा ?

मुंबई—अपोलो बंदर १९१५ आर्यवैभव.

## शिवाजीच्या छायेचे उद्गार.

चाल—राजहंस माझा निजला.

अहह ! ते कसे हो, माझे—
दिन गेले स्वातंत्र्याचे ?
पूर्वींची कशी समशेर ?
गंजली **भवानी** थोर ?
एकही चिंधि गवसेना
जरतारि बाहुल्याची ना ?
चाल—मज ऐकुं न येइ कुठेंही
जयघोष पूर्वजांचाही,
ध्वनि ' महादेव हरहरही '
पू. चाल—अहह ! हे भ्याड कां असती—
माझेच मराठे जगतीं ?
हें असें कसें हो, झालें ;
मम बीजा फल हें कसलें ?
ही भ्याड वृत्ति, हा लोभ
शिकविला न मी या दंभ ;
ही भेदभावना यांतें
शिकविली कुणी? ना कळतें.
चाल—हा खोटा संतोषहि या
शिकविला न केव्हांही त्यां

विनविलें उलट दावाया—

पू. चाल—बहु लोभ राष्ट्रसेवेंत;
परि रत हे निज दास्यांत!
ही दास्यरती मी यांतें
लाविली कधीं कां गमतें?
मंद्धधुदास्यदु:खांतें
हरवावें हें सुख मातें.
निज राष्ट्रभावना यांची
हरपली कळे ना कैची?
चाल—तो वीर सिंह तानाजी
तो जिवलग माझा बाजी
मम मित्र शूर येसाजी
पू. चाल—रणधीर कुठें ते योद्धे?
हे कुठें शयनवर गद्धे?
बुजबुजति किडे शेणांत
फिरति वा कृमी रक्तांत,
वंशज हे माझे तैसे
बहु दुर्गुणांत रत कैसे?
दृष्टि ही कळेना यांची
व्यसनिंच कां खिळली साची?
चाल—हे पहा एकमेकांचे—
घेतात बळी प्राणांचे,
दावितां अमिष लाभाचें!

पू. चाल—छे! नको नको रे देवा—
पाहण्या असा देखावा!
मुंबई—श्रुतिबोध कचेरी १९१५.

## शिवबा येइल भूवरती.

चाल—डंडे गुंडे हिरसे तट्टू—
बाल शिवाजीराजा झाला
अवघ्या साता वर्षांचा
तोंच दिसाया लागे तुंगां—
वरतीं तो सह्याद्रीच्या.
श्वापद रानांतिलही झाले
त्याचे मित्रच त्यावेळीं;
हिंस्र परी शिवरायापुढतीं
वृत्ति तयांची मावळली.
वन्य लतांच्या कुंजामाजीं
बघुनी तेजःपुंज शिवा
रुधिरनखी वनराजाचाही
मद स्रवाया लागावा.
शिवबालानें निज तेजानें
सगळीं रानें भारावीं;
जिकडे तिकडे वीररसाचीं
गीतें तेथें उमटावीं.
" आर्यांनो, निज धर्मा राखा!
हाणा! मारा! कांहिं करा!

गोब्राम्हणप्रतिपालक ईश्वर,
त्याचा मनिं अभिमान धरा! ”
असें आणखीं असलीं गीतें
उठलीं तेव्हां रानांत;
रान कशाचें ? भान शिवाचें
होतें तें हो, स्फूर्तींत.
दगड न निर्जिव, जिवंत होत्या
शिळाहि शत्रूवर जाया;
वृक्ष स्थाणु परंतू तेही
पाहति यवनां झोडाया.
अर्धीच चंडांशू, शिवतेजें
होऊनि सविता तप्ततर
जळे पडाया निज अग्नीच्या—
शत–कल्लोळें शत्रुवर.
अखिलच सृष्टी तेजोवृष्टी
करिते शिवबास्फूर्तीनें;
कां न वरावी जूट, त्यजावी—
फूट नरें भूप्रेमानें?

× × ×

शूर शिवाजीप्रेमें बाजी
येसाजीही तानाजी
जमले होते एक दिनीं त्या—
जावळिच्या रानामाजीं.
बोले तानाजी “ येसाजी,

बाजी रे शिवबाप्रेमें
पुनीत झालों अखंड धालों
देशप्रेमाच्या नियमें.
अमुचा राखू धर्म, पारखू—
यवनांचें हो, मर्म अह्मी;
निज देशातें परदास्यांतुन
खचित सोडवू वीर अह्मी.
दरीविहीरी गुहालतांच्या
जाळ्यांमधुनी लपलेले
नर धुंडाळू वृद्ध मराठे
स्त्रियाहि बालक दमलेले.
गोमातेचा निज मातेचा
भूमातेचा सूड महा—
दुष्ट दांडग्या शिखानष्ट त्या
यवनांवरतीं उगवुं पहा!
बोला हरहर महादेव! हो,
फुंका भेरी जोरानें!
अशी तुतारी द्या फुंकोनीं
ठार मरावें यवनानें!"
क्षणांत गेलें रान भरोनी
जावळिचें तें नादांनीं;
नादांनीं नच, भेरींनीं नच,
परि वीरांच्या हृदयांनीं!

\+ \+ \+

काहीं कालें शांत जहालें
निदान वरवर तें रान;
शांत न होणें देशप्रेम—
ज्योती हृदयांतील भग्न.
गिरिवरनिर्झर जरी थांववी
गाणें अपुलें वीराचें
शिवरायाचें नेतच होता
देशोदेशीं यश साचें.
भेरीस्वनही जरी निमाला
त्यांतिल वायू नच रमला !
होता तत्पर पुन्हःपुन्हा तो
वीरस्वन फुंकायाला.
प्रस्तरराशी पुन्हःपुन्हा ती
नादां फिरवी जोरानें,
तरि ते वीरांच्या हृदयांतच
बसले जाउन नेमानें.
वदला बाल शिवाजी राजा
" माते, मिळतां मित्र असे,
दुष्ट यवनदास्यांत वदे गे,
सुत रुळतिल अजुनीहि कसे ?
हा मम तानाजी, हा बाजी,
हा येसाजी तव दास,
मित्र जिवाचे, जीवच साचे
सारे या मद्देशास.

मद्देशा !......हा !.....मद्देशा !......हा !
मद्देशच कां खरा खरा ?
कां मग वणवण भणभण फिरतों
नित्य अम्ही नव दरा दरा ?
खोल खोल भूमींत तुझेंही
मंदिर माते, सान असे;
जयघोषांनीं दूर न जावें
ह्मणुनि पहाडां वरिलेंसे.
असेल कां जाळींत हेर या ?
ऐशी चिंता नित्य मनीं;
भेरनिादांविना अह्मी गे,
वदतों सारें कुजबुजुनी.
हा छावा, हा गावा फिरतो
खुशाल खोऱ्यांदऱ्यांतुनी;
मनुजासम गे मनुज असोनी
आह्मी बसतों वनिं लपुनि.
मनुजाच्या जन्मास कशाला
देवि भवानी,आणियलें ?
कशास दिधला देह नराचा ?
नरजातीतें लाजविलें ?
कुठें पार्थ तो ? कुठें कृष्ण तो ?
कुठें कर्ण ? ते भीष्म कुठें ?
कुठें सुयोधन ? कुठें दशानन ?
तसा तदंतक राम कुठें ?

कुठें भीम ? दुःशासन कोठें
    लंकापतियुवराज कुठें ?
कुठें भ्याड मुर्दाड मराठे
    षंढ अतांचे सांग कुठें ?
पत्नीकेशां करितां स्पर्श
    दुश्शासन भीमें वधिला;
हरहर देती आज मराठे
    पत्नी दुहिता यवनाला ?
रणसंग्रामें आत्मघातही
    केला परि नच राज्य दिलें.
कुठें निश्चयी सुयोधनाचें
    तेज मराठे हो, लपलें ?
ठावे झाला राम आपुल्या
    मरणासाठीं या जगतीं,
ठार जाहला तरी रावणें
    दावियली नच लव भीति.
कुठें वीर्य तें, कुठें तेज तें
    शासनकर्त्यांचें तुमचें
गेलें सांगा गडी मराठे ?
    झालें झालें शत्रूचें !
मोगल झाला शासनकर्ता,
    शासित झालां गलित तुम्ही;
गुलाम झाला धनी; धनी हे—
    गुलाम झालों हाय अहीं !

गुलाम झालों हाय अह्मी !
    हा ! बटीक अमुची स्त्री झाली !
माता हिंदू, बाप अहिंदू
    अशीं मुलें पैदा झाली.
कुठली माता ? कुठल्या ताता
    अशा मुलानें पूजावें ?
देश आमुचा हाच असें हो,
    कुणास त्यांनीं दावावें ?
गेला गेला धर्म बुडाला;
    सारा चुथडा उद्भवला !
गडी मराठे ! तुह्मी स्वहस्तें
    स्वधर्म सारा लोपविला !
बाप मारिला, दात्रियलाहि
    निज बंधूचा गळा तुह्मी;
स्वार्थी पोकळ भुलुनी शत्रू
    घरीं घातला स्वकरांहीं.
छिन्नभिन्न देशास कांपिलें
    तुमच्या हस्तें शत्रूनें;
बेकीचा निज डाव साधिला
    खरोखरी कौशल्यानें.
अथवा कसलें कौशल त्यांचें ?
    सारें अमुचें अंधत्व;
निज हृदयाशीं घट्ट धरोनी
    आळस, झालों निस्सत्त्व.

उठा मराठे, उठा गडी हो,
आळस झाडा त्वेषानें !
उठा उठा बांधा निज कमरा
काम कराया एकीनें !
जातिवंत मतिमंत मराठे
मिळतां जगतीं मूठभर
करिल शिवाजी, माते, आजीं
या भूमीचा स्वर्गवर.
हा येसाजी, हा तानाजी
मालुसरे, हा बाजीही
देवी, दिधले प्राणच मज हे;
करितों आज प्रतिज्ञा ही !
" जेव्हां जेव्हां भारतभू ही
पडेल परक्यांच्या हातीं,
तेव्हां तेव्हां सोडविण्यां तिज
**शिवबा येइल भूवरतीं "**

खंडाळ्याचा घाट. शिवसाम्राज्य १९१५

## प्रिय चंडोला !

[ ही कविता प्रसिद्ध आङ्ग्ल कवि Shelley याच्या अति-प्रसिद्ध Sky-lark या कवितेचें भाषांतर होय. ]

वृत्त—स्त्रग्विणी.

स्वस्ति ते ! स्वस्ति ते ! मूर्त आनंद तूं !

गानमग्न प्रियाळा, न पक्षी मसी !
गानताना स्वधर्मेंच घेसी प्रिया,
शांत आकाशसंचारसौख्यामधीं;
गानताना स्वकर्णीं गड्या, ऐकुनी
सांग वानू कसें पक्षिनें बोधुनी?

पक्षि कोणी वदावें सया तूजला
अग्निकांती जयाची झळांळ नभीं?
भूमि सोडोनि केव्हां नभीं जातसे
देह तूझा, न मिता, मला ठाउकें.
मात्र ठावे मला एकमेकांहुनी
नित्य तूझ्या भराऱ्या नव्या उंचही.

पाहसी ना समुद्रा अगाधा गड्या,
गान गात स्वयें घेसि जेव्हां उड्या.
पश्चिमेसी करी भानु लज्जामुखी
मेघवस्त्रें मुखा ती तदा झाकित;
सूर्य हासे विनोदें:—सदानंद तो
फाकला रे तयांचा तुझा गायनें.
सूर्यरश्मीमधीं जेंवि तारा लपे,
दीप्त संध्या तुझ्या उड्डनाभोंवतीं
शांत होई प्रिया मंद तेविं स्वयें.
गान ऐके, न मूर्ती जरी दीसते.

चंद्रम्याची पहा ती प्रभा फाकली !
दिव्य आकाशमार्गें तुला जावया;

पृथ्विगोलावरी अंतरिक्षांतिल
दीप देई मुदें तेज तें फेकुनी.
गायनाला तुझ्या येइ मित्रा भर,
चद्रंबिंबें जयीं स्वर्ग दीपावला.

सांग मित्रा तुझें रूप रे कोणतें?
दीसतोसी जगीं तूं कुणा यासम?
इंद्रचापांतुनी ना कधींही गळे
बिंदु, तूझ्या मनोहारि तानांसम.
गुंगुनीया अहाहा ! कवी सन्मनें
गाइ आनंदमंत्रा स्वयंस्फूर्तिनें;
गान त्याचें जगा घेइ आकर्षुनी
त्यास ज्यानें दिलें पूर्वीं धिक्कारुनी.
दिव्य आशा तसें प्रेम तो शीकवी
तीच तूझी सया, वाटते थोरवी.
प्रेमगोष्टी प्रियासी करी कामिनी
जेविं आलिंगनीं मंजुमंदस्वनीं,
वेणुनादें जशी गौरकाया रती
गाइ आनंदपात्रा नवीं गायनें;
गीत-आलाप चंडोल, तूझे तसे
कर्ण माझे पहा घेति हे प्राशुनी.
कंदरींच्या धुक्यानें जरी झाकिला
पुष्पिं बालांकुरींही जरी लोपला
सोनियाचा किडा आत्मशोभा जसा

फेकितो, गाळितो, तूंहि वीणारसा.
पर्ण-अच्छादनानें कळी दाटली
मंदवायूमुळें फाकली फाकली.
फाकफाकोनि आला गुलाबा पहा
मृत्यु रोपावरी त्याच दो दिवशीं,
पुष्प जाई मरूनी, पतंगास त्या
गंधमोदें परी ये पहा मूर्च्छना;
तेविं चंडोल तूझें करी गायन,
तानभरें मना टाकितें मोहुन.
अमृताची वसंतांत वृष्टी जशी,
जीवनासी धरी दिव्य सृष्टी जशी,
जेविं पुष्पें सुगंधें स्वयें मोहतीं,
तेविं तैशीं सख्या गानरीती तुझी.

सांग आतां खगा, वा अरे किन्नरा,
गानतानामधीं कोणती चिंतना ?
स्तोत्रिं दिव्यीं कधींही नसे गायिलें
प्रेम-मद्यांस कोण्या कवीनें असें.
सत्य सांगू तुला ? यक्ष गंधर्वही
स्तब्ध होती प्रियाळा, तुझ्या गायनीं !
व्यंग कोठेंतरी यक्षगानामधीं;
गान अव्यंग तूझें खरें रे खरें !

सांग चंडोल, आतां कुठोनी निघे
स्फूर्ति तूझी अशा स्वर्गगानास्तव ?

पृथ्विपृष्ठें खगा, अद्रिनें वा दिली
स्फूर्ति गाया तुला वा महासागरें ?
अंतरिक्षांतल्या गूढतत्त्वें वदें
गायकाची दिली तान तूला अशी ?
प्रेम तूझेंच वा तूजला शिकवी ?
सांग दुःखामुळें वा असा गातसे ?
ठाउके वा नसे एकही कारण ?
ज्ञान नाहीं ह्मणोनी असें गान वा ?

ज्ञात झालें पहा सर्व आतां मला;
प्रेमगाणें तुझें ज्ञात ना तूजला.
गासि गाण्यास ना रे विनोदास्पदा ?
गायनाच्याविना काम तूतें नसे.
कार्य तूझें तसें रे, ह्मणोनी असें
नित्य नाविन्य तूझ्या अलापीं असे.
सौख्य जेथें तिथें दुःख हा नीयम--
खास ऐशा तुझ्या गायनीं अल्पन.
मृत्यु आह्मां पहा भीति दावीतसे;
झूरझूरोनि आह्मी पहा वाळतों.
मृत्यु गीतांमुळें तूं खगा, जिंकिसी
अर्थ त्याचा खरा तूजसी दीसतो.
सार्थ अर्थाविना गायनाची नदी
वाहती का अशी हीम-अद्रीतुनी ?
पूर्वजन्माकडे आमुचा नेत्र हा,

नेत्र हाही असे जन्मजन्मांतरीं
नाहिं कोठेंहि ऐशा सुखां वांछितों;
हाय ! अंतीं अतीं दुःख हें भोगितों !
दिव्य हास्यांतही आमुच्या दुःख रें;
गानमाधुर्य कष्टेंच लागे बरें.

द्वेष, भीती तसा गर्व, यांचा जरी
द्वेष आह्मां पहा साधता रे कधीं;
अश्रुपाता न येतों अह्मी या जगीं
गान तूझें न येतें तरी आयकूं.

यक्षागानांतल्या तानसौख्येंहि न,
ग्रंथखानींतल्या रत्नतेजेंहि न,
अंतरिक्षप्रिया रे तुझें कौशल
नाहिं खालावलें, हें प्रतीभा वदे.

स्वाद अर्धा तुझ्या दे मनींचा मला !
मोहवीन प्रिया मी जनां गायनें.
जेविं माझें तुवां तेविं त्यांचेंहि मी
रंजवीन प्रभेनें मुदें अंतर.

धूळें. पोएट्स् कॉर्नर् चित्रमयजगत् १९१२

इंदूचें ल .

लावणी.

हातामध्यें फूल घेतलं माझ्या नानींनं

पाहा तीचं वदन कीती गेलं खुलून.
हासून हासून गेले तीचे डोळे लागून;
नाचून नाचून गेले तीचे पाय दमून.
फूल फेकून घेतलं तीनं पुन्हा रांगून;
टाकलं माझं मन मोहून माझ्या बाळानं.
डिग डिग लाला, डिग डिग लाला; उभी राहीली;
सहजच बाला गुलाबाला विसरून गेली.
बसली नानी थकून तेव्हां फुलावरी बसली;
दुसरी दिसतां गुलाबकलिका रांगून गेली.
खेळून खेळून टाकली तीनं कलिका चोळून
मोहून दिला कलिकेनेंही सुवास सोडून!

जळगांव-ग्रीन बॉवर १९१६.

## ती हीच भागीरथी.

श्लोक

कैलासीं बसली हरस्वरुप तें चित्तीं अणूनी सती;
सर्वस्वा हरुनी वनीं दवडिला म्यां व्यर्थ वाटे पति.
तों फाश्यांवर दृष्टि जाउनि तिची गुंगोनि गेली मती.
अश्रू मानसवासिनी त्यजितसे ती हीच भागीरथी.
अश्रू मानसवासिनी त्यजितसे पाहूनि भागीरथी
सोडूनी पतिमस्तकस्थल सतीसेवार्थ गेली गृहीं;
लत्ताघात परी करी तिजवरी मात्सर्ययुक्ता सती
सोडी मानसवाहिनी गृह जवें भागीरथी तीच ही.

प्रयाग संगम १९१०.

## मी कवियित्री कशीं झाल्यें.

अलीकडे बऱ्याच आधुनिक कवीच्या पत्न्या कवयित्री होऊं पाहत आहेत. या गोष्टीचा मला मनापासून आनंद वाटत होता; परंतु एका कविमित्राच्या बायकोनें, आपण कवयित्री-पदास कशा पोंचलों याचा खरा इतिहास मजजवळ सांगितला. तो थोडक्यांत पुढील कवितेंत मी जिज्ञासु वाचकांस--कवयित्रींच्या कविपतींना नव्हें--सांगत आहे.

चाल—ओळखिल्यें लहान होता---

ते—विनवी मी चारुगात्री, कवयित्री होइ गे;
मी—कवयित्री काय कैसें मजसी हें ना कळे.
ते—जें तुजसी वाटतें तें गाऊनी बोल गे;
मी—मजसी तें येत नाहीं; गाइन मी आगळें.
ते—गाईं तें आगळेंची, पाहूं दें तें तरी;
मी—प्रियकर हो, गान गात्यें अपुलेंची सत्वरीं.
ते—जी माझी तीच कांते, कविता गे, तव असे.
मी—मग कांता काव्यदेवीमूर्तिच मी कां नसे?

जळगांव. गिरणेचा पूल १९१६. ज्ञानांजन.

## गीतारहस्यानंद.

श्लोक.

करितसे अलि गुंज नवा नवा
सुमवती अवनी बहु हासते.
करितसे क्षिरसागर सातवा

अभिनवा विमला रुचि वाटते.
नव विहंगम रंगहि ते नवे,
नव लता नव वृक्ष नवीं फुलें,
नव तडाग परागहि ते नवे,
नव करी करिणीसह तो झुले
गगनींही ग्रहचक्र नवें फिरे
छबि तयांतुनही नव ओसरे
मधुर नूतन गीत नभीं स्फुरे
अवनिनूतनरूप मनीं भरें.
धरि धरा अशि नूतन रूप कां ?
पितर कां पितृलोकिंहि हर्षित ?
अजड ही जडही नव सृष्टि का
गमतसे अशि आज मुदान्वित ?
नच नरा तुज ठाऊक कां पडे,
जगतिं कर्म-अनादर ना दिसे ?
अजवरीं सुजनांसहि जी नडे
प्रहत निष्कृतिराक्षसि होतसे.
अजुनि कां दिसला नच लोचनां
जय,[१] महाराणि जो बहु शोभला;
परिस ही नव केसरिगर्जना
करित जागृत दीर्घ रवें तुला.
महाराष्ट्रीं बाळ द्विजकुलज गंगाधर-सुत
वसे पुण्यक्षेत्रीं टिळक उपनामें श्रुति-रत

१ कर्मयोगजय.

**रहस्यां गीतेच्या प्रकटवुनि अष्टादशशतीं**
समर्पी श्रीशातें सदतिसयुतीं तो शकमितीं.

करि करीं सुकवे, नव गान रे,
नविन घे अति सुस्वर तान रे;
भयद मोहनिशातम ना उरे;
अरुण " **कर्मसु कौशल** " तो स्फुरे.
अजवरीं जनतामतिभामिनी
कृतिहिना भ्रमदरींत निद्रिता;
परम निष्कृति मोक्षच कल्पुनी
वरितसे मनिं संसृतिशून्यता.
जरि नरास गतिलाभ[२] होतसे,
नच टळे कधिं कर्म तयासही.
सुगम तत्त्व पहा मग हें असे—
नियत कर्म करीं त्यजि आसही!
अहह तत्त्व सुरेख झुगारुनी
रत सदा कृति-हीनच भक्तिंत;
त्यजुनि कर्म सुयोगाहि[३] खंडुनि
धरि सुराष्ट्र अधोगति निश्चित.
भरतभू प्रिय धर्म सनातन,
नच तयांस अधोगति नेमिली.
धरिल तो अवतार जनार्दन;
खचित बाळमिषें कृति दाविली.
करुनि योग्य सुयोगसुमिश्रण[४]

२. मोक्ष ३ कर्मयोग. ४·भक्ति, ज्ञान व कर्म या योगांचें एकीकरण.

नर करील जगिं लोकसंग्रह;
ह्मणुनि ऊठ कवे, नव गायन
करिं पुन्हा, तव पालटले ग्रह.

जळगांव–गिरणेचें वाळवंट १९१५ चंद्रिका.

## जाग्रत !

The words dream, illusion. Māyā are tricks of speech, habits of our relative consciousness.

*Arobindo Ghose.*

चाल——हससि असा उगिच कसा—

ऊठ ऊठ जागृत हो, माग रे वरा !
आत्मवंचना न करीं हिंदसुतवरा ! धृ०
तव निद्रा नच समाधि । उघडीं रे नयन आधीं
मायेचा हा व्याधी । लागला नरा ॥
' माया ' हा शब्द फोल । तार्किकांस फार खोल
सत्य शोधनीं न मोल । त्यासि रे जरा ॥
मायेच्या मंत्राची । गुंगि तुला ही जाची
कृति करि तुज डाकिणिची । फोल हरभरा ॥
फुगसी कां ज्ञानभरें ?——ज्ञानच कां, शोध बरें;
ज्यानें निज वीर्य हरे । ज्ञान कां नरा ?
आत्म्याच्या ज्ञानानें । व्हावें कां मनुजानें
कृतिनें कीं वाचेनें । हीन बा नरा ?
हीन दीन षंढासम । करि जें निस्सत्त्व परम

त्या ज्ञानें शरम शरम। मनिं तरी जरा ॥
ज्ञानी ह्मणवोनि घेसी अंतरिं परि दचकतोसि
सांग भीति येत कशी। कुठुनि अंतरा ?
येइ न कां निर्भयत्व । मंगलमय तुज ममत्व,
धरितां बहु विमल तत्त्व—मार्ग तो खरा ?
नच तव हें ज्ञान खरें । निष्कृतिसुखसुप्तिच रे;
मायेचें स्वप्न पडे । तेधवां तुला ॥
मिथ्या तें स्वप्न तुझें। मिथ्या मायाहि असे;
मायेचें अजुनि पिसें । तुज कसें नरा ?
ही माया आजवरीं । निष्क्रिय बहु तुजसि करी
निष्क्रिय कृतिनेंच तरी । करिं तिला नरा ॥
ज्ञानाचे मार्ग सकल । धरिं, धरील खचित सुफल
यत्न तुझें कधिं न विफल । करिल सुतवरा ॥
अवडंबर शब्दांचें। ज्ञान न तत्प्राप्तीचें
आत्मभाव हृदयींचें । योग तो खरा ॥
त्वद्ज्ञानें निर्मियली । मायेची स्त्री अपुली,
क्रीडा मग आक्रमिली । व्यर्थ पामरा ॥
ज्ञानयोग षंढ तुझा । वंध्या स्त्री ही माया;
मग कसला तेथ पहा । कर्मसुत खरा ?
सोडसोड माया ही । जागृत हो लवलाही
बोलवि तुज सृष्टि पाहीं । करिं करीं त्वरा ॥

जळगांव–गिरणेचें वाळवंट. धर्मजागृती. १९१५

## मी सांगू तरी काय ?

चाल—उद्धवा शांतवन कर जा—

धाव रे धाव परमेशा
कंटाळा आला आला.
दिन किती सोसुं हीं दुःखें ?
जीव हा नकोसा झाला.
हीं सुखें असति कीं दुःखें
हा विवेक नाहीं मजला.
चाल——वदशील ' नमन हें विटलें,
संसारें पुनरपि चळलें;
वैराग्यपथीं तें चुकलें;'
पू. चालः— हो ! खरें खरें ! परि देवा,
श्रद्धेचा लेश न मजला.
' श्रद्धा दें ' वर कां मागूं ?
छे ! नको नको ती श्रद्धा !
होईल कष्टदा मजला
रमणी रे, जैसी वृद्धा.
शांत ती सुखद जरि झाली,
आरसा उचित कां अंधा ?
चाल—मी डोळस अंध जहालों.
वासनापिकांत बुडालों;
स्वच्छेनें ज्ञाना मुकलों;

पू. चाल—छळिन मी तिला साध्वीला
दे संतां, नच मतिमंदा !
" ज्ञान दें " विनवुं कां तुजला?
अहह तें अग्निसें मजला !
जातां तन्निकट किं पापी
भाजील दीन नाथाला !
जाईल मशक कां स्वेच्छें
दीपातें शांतिसुखाला?
चाल—करिशील शांत जरि त्याला । टाकुनी उपरि कव
नाला । मग देशिल मधु घुटक्याला,
पू. चाल— क्षुद्र हा मशक फूगेल सोडील प्रेमलेशाला.
कां प्रेम सया, मग देसी?
बल माझें कां न पहासी?
प्रेमलेश खिळुनी अंगीं
संसारीं बांधिल मजसी.
संतसंग देसी कां रे?
पापी हा योग्य न त्यासी.
चाल—भांबावुनि गेलों देवा,
वद मागूं कां तव सेवा,
परि संत वदे ' मम मेवा '
पू. चाल—इष्ट जें तुला तें देईं !
नाथ हा दीनमुख पाहीं.

धुळें. मोतीतलाव १९१२. उषा.

## वर मागितलाच पाहिजे !

चाल–लंडें गुंडें हिवसें तट्टूं–

नाथा, वरिसी कां ही ऐसी
  रीती मतिमंदाची ही?
देतां वर मी सत्वर न:मी
  नकोंनकोसें कां होई?
मनीं न श्रद्धा, मनीं न कांहीं
  ज्ञान सुभक्तीहीं हृदयीं,
असें कसें रे, वाटे आजीं;
  प्रतिभा तव ही नसे कधीं.
ज्ञानाकरितां भक्तीकरितां
  कर्माकरितां झटलासी
झटतो अजुनी झटशिल पुढतीं,
  मग भीती कां ही धरिसी?
श्रम पाहोनी द्यावा वर हें
  ब्रीदच माझें तुज ठावें.
ठावे भक्तब्रीद, वरातें–
  वरुनी वर्तन ठेवावें.
आजवरीं ना आयकिला म्यां
  नकार कोणा भक्ताचा,
ठावें तुज हें, वदें ह्मणोनी
  वर बाला या समयाचा !

धुळें–किल्ला १९१७.

## तर मग हें दें !

श्लोक

यद्द प्रेमें मजवरि जरी होसि तूं दानकामें,
यावी देवा, जनहितरति त्वांच सत्यस्वरूपी.
भक्ति-ज्ञानें मजसि रमवू तेथ मार्गीहि कोऽपि
होवो कांहीं, वदुत जन वा मूढमंदादि नामें.

धुळें. पोएट्स् कॉर्नर. १९१७ — आर्यवैभव.

REFBK-0001570
REFBK-0001570
१५५०